# तात्पुरती कार्यावली

**सोमवार, दिनांक ६ मार्च, २०१७ रोजी सकाळी ११.०० वाजता**
**मुंबई येथील विधान भवनात सुरु होणाऱ्या महाराष्ट्र विधानपरिषदेच्या**
**सन २०१७ च्या प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशनाची तात्पुरती कार्यावली.**

**एक** : राज्यपालांचे अभिभाषण.

**दोन** : राज्यपालांच्या अभिभाषणाची प्रत सभागृहासमोर ठेवणे.

**तीन** : राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आभार प्रदर्शनाचा प्रस्ताव.

**चार** : सभापतींनी, सभापती-तालिका नामनिर्देशित करणे.

**पाच** : प्रश्नोत्तरे.

**सहा** : अध्यादेश सभागृहासमोर ठेवणे.

**सात** : राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा.

**आठ** : सन २०१७-२०१८ च्या अर्थसंकल्प सादर करणे.

**नऊ** : सन २०१७-२०१८ च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा.

**दहा** : सन २०१६-२०१७ च्या पुरवणी मागण्या सादर करणे.

**अकरा** : सन २०१६-२०१७ च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा.

**बारा** : लोकलेखा समितीचा अहवाल सादर करणे.

**तेरा** : सार्वजनिक उपक्रम समितीचे अहवाल सादर करणे.

**चौदा** : अंदाज समितीचे अहवाल सादर करणे.

**पंधरा** : अनुसूचित जाती कल्याण समितीचा अहवाल सादर करणे.

**सोळा** : विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीचा अहवाल सादर करणे.

**सतरा** : पंचायती राज समितीचे अहवाल सादर करणे.

**अठरा** : रोजगार हमी योजना समितीचा अहवाल सादर करणे.

**एकोणीस** : मंत्र्यांनी कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

**वीस** : **शासकीय विधेयके. (गत सत्रातील प्रलंबित)**

**विधानसभेने संमत केलेले खालील विधेयक विधानपरिषदेकडे प्रलंबित :-**

"सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक ५४ - महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१६"

**एकवीस** : इतर शासकीय कामकाज ज्याची सूचना नंतर देण्यात येईल.

**बावीस** : शोक प्रस्ताव.

**तेवीस** : इतर प्रस्ताव.

**चोवीस** : तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर अल्पकालीन चर्चा- म.वि.प.नियम ९७ अन्वये.

**पंचवीस** : तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे मंत्र्यांचे लक्ष वेधणे - म.वि.प.नियम १०१ अन्वये.

**सव्वीस** : **अशासकीय विधेयके - विचारार्थ -**

**(१)** सन २०१३ चे वि.प.वि.क्रमांक ११ - बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१३ **- श्री.कपिल पाटील, वि.प.स. यांचे**

**(२)** सन २०१४ चे वि.प.वि. क्रमांक ११ - मुंबई ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, २०१४ **- श्री.अमरसिंह पंडित, वि.प.स. यांचे.**

**(३)** सन २०१४ चे वि.प.वि. क्रमांक १२ - महाराष्ट्र स्त्रियांची छेडछाड करण्यास प्रतिबंध करण्याबाबत विधेयक, २०१४ **- श्री.अमरसिंह पंडित, वि.प.स. यांचे.**

**(४)** सन २०१४ चे वि.प.वि. क्रमांक १३ - बियाणे (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१४ **- श्री.अमरसिंह पंडित, वि.प.स. यांचे.**

**(५)** सन २०१४ चे वि.प.वि. क्रमांक १४ - महाराष्ट्र शेतकरी, कारागीर व भूमिहीन मजूर यांना निवृत्तीवेतन देण्याबाबत विधेयक, २०१४ **- श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स. यांचे.**

**(६)** सन २०१४ चे वि.प.वि. क्रमांक १५ - कारागृहे (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१४ **- श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स. यांचे.**

**(७)** सन २०१४ चे वि.प.वि. क्रमांक १६ - महाराष्ट्र बेकारी निर्मूलन विधेयक, २०१४ **- श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स. यांचे.**

**(८)** सन २०१४ चे वि.प.वि. क्रमांक १७ - मुंबई दारुबंदी (सुधारणा) विधेयक, २०१४ **- श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स. यांचे.**

**(९)** सन २०१४ चे वि.प.वि. क्रमांक १८ - हिंदू अज्ञानत्व व पालकत्व (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१४ **- श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स. यांचे.**

**(१०)** सन २०१४ चे वि.प.वि. क्रमांक १९ - महाराष्ट्र हिंसाचार व लैंगिक गुन्ह्यांना प्रवृत्त करणाऱ्या जाहिराती व जाहिरात-फलक लावण्यास प्रतिबंध करण्याबाबत विधेयक, २०१४ **- श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स. यांचे.**

**(११)** सन २०१४ चे वि.प.वि. क्रमांक २० - भ्रष्टाचार प्रतिबंध (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१४ **- श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स. यांचे.**

**(१२)** सन २०१४ चे वि.प.वि. क्रमांक २१ - महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) (सुधारणा) विधेयक, २०१४ **- श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स. यांचे.**

**(१३)** सन २०१४ चे वि.प.वि. क्रमांक २२ - फौजदारी प्रक्रिया संहिता (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१४ **- श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स. यांचे.**

**(१४)** सन २०१४ चे वि.प.वि. क्रमांक २३ - बाल कामगार (प्रतिबंध आणि विनियमन) (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१४ **- श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स. यांचे.**

**(१५)** सन २०१५ चे वि.प.वि.क्रमांक १ - महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (सुधारणा) विधेयक, २०१५ **- श्री.संजय दत्त, वि.प.स. यांचे.**

**(१६)** सन २०१५ चे वि.प.वि.क्रमांक २ - महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन (सुधारणा) विधेयक, २०१५ **- श्री.संजय दत्त, वि.प.स. यांचे.**

**(१७)** सन २०१५ चे वि.प.वि.क्रमांक १४ - महाराष्ट्र राज्य विशेष मागास प्रवर्ग-अ (एसबीसी-ए) करिता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील जागांच्या प्रवेशाचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे किंवा पदांचे) आरक्षण विधेयक,२०१५ **- श्री.शरद रणपिसे, वि.प.स. यांचे**

**(१८)** सन २०१५ चे वि.प.वि.क्रमांक १५ - महाराष्ट्र राज्य लोकसेवा (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागासप्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण) (सुधारणा) विधेयक,२०१५ **- श्री.शरद रणपिसे, वि.प.स. यांचे**

**(१९)** सन २०१६ चे वि.प.वि.क्रमांक २ - महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध (सुधारणा) विधेयक, २०१६ **- श्री. ख्वाजा बेग, वि.प.स. यांचे.**

**(२०)** सन २०१६ चे वि.प.वि.क्रमांक ५ - मुंबई महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०१६ **- श्री.शरद रणपिसे, वि.प.स. यांचे**

**(२१)** सन २०१६ चे वि.प.वि. क्रमांक ६ - महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०१६ **- श्री.शरद रणपिसे, वि.प.स. यांचे**

**सत्तावीस : अशासकीय ठराव (म.वि.प. नियम १०२).**

## ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स. यांचे ठराव क्रमांक २ व ३

(२) राज्यात ज्येष्ठ नागरिकांची वाढती संख्या तसेच नजिकच्या काळात ४ कोटीपेक्षाही अधिक संख्या वाढण्याचा करण्यात येत असलेला अंदाज, तथापि माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये ज्येष्ठ नागरिकांना सोई-सुविधा उपलब्ध करुन देण्यास राज्य शासन असमर्थ ठरत असल्याचे ज्येष्ठ नागरिक दिनाच्या निमित्त ज्येष्ठ नागरिकांनी आयोजित केलेली शिबिरे, मेळावे व परिषदामधून निदर्शनास येणे, परिणामी ज्येष्ठ नागरिकांच्या समस्यांची वेळीच सोडवणूक होण्याच्यादृष्टीने तसेच वृध्दापकाळात सोई-सुविधा उपलब्ध होण्याकरिता ज्येष्ठ नागरिकांसाठी शासन स्तरावर एक स्वतंत्र मंत्री नियुक्त करुन मंत्रालयीन स्तरावर देखील त्यांचेसाठी स्वतंत्र विभाग निर्माण करण्यात यावा व ज्येष्ठांची वयोमर्यादा ६५ वरुन ६० वर्षे करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.

(३) "राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे प्रमाण, नोकरी व रोजगाराअभावी तरुणांमध्ये निर्माण झालेले वैफल्य, शासनाने बंद केलेला सुशिक्षित बेरोजगार भत्ता, रोजगाराच्या भाग भांडवलासाठी बँकासारख्या आर्थिक संस्थांकडून येणाऱ्या अडचणी, या बाबी विचारात घेता बेरोजगारांच्या समस्या सोडविण्यासाठी व गरीब कुटुंबातील व्यक्तिंना रोजगार मिळविण्याच्यादृष्टीने एक सक्षम व स्वतंत्र यंत्रणा स्थापन करण्यात यावी व सुशिक्षित बेरोजगारांना पुन्हा सुशिक्षित बेरोजगार भत्ता सुरु करावा, तसेच रोजगारासाठी भाग भांडवलाची सोय करावी त्याचप्रमाणे निवडणूक, जनगणना विषयक कामे शिक्षकांना देण्याऐवजी सुशिक्षित बेरोजगारांना देण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

## श्री. संजय दत्त, वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ६, ७, ८, ९ व १०

(६) ”मुंबई शहरामध्ये अत्यंत मोक्याच्या जागेवर असलेल्या अनेक खाजगी मिल मालकांच्या तसेच राष्ट्रीयकृत कापड गिरण्या बंद पडल्यानंतर गिरण्या ज्या ठिकाणी होत्या, त्याठिकाणी गगनचुंबी इमारती, मॉल, खाजगी कंपन्यांच्या इमारती बांधण्यात येणे, परंतु सदर जुन्या गिरण्यांमध्ये काम करणारे कामगार व त्यांच्या कुटूंबियांना मात्र गिरण्यांच्या जागी उभ्या राहणाऱ्या इमारतींमध्ये राहण्याच्या जागा देण्यात न येणे, तसेच मॉल, कार्यालय यामध्ये नोकऱ्यासुध्दा न मिळणे, गिरणीच्या जमिनीपैंकी विहित हिस्सा महापालिका, म्हाडा यांना द्यावयाचा असतांना अनेक मालकांनी जमिनी म्हाडा व महापालिकेस न देणे, ६७,००० घरे गिरणी कामगारांकरीता बांधणार असे आश्वासन शासनाकडून देण्यात येणे, तथापि, बांधलेली ६,९०० घरे गिरणी कामगारांना केव्हा वितरीत करण्यात येणार आणि राहिलेली ६०,००० घरे केव्हा बांधणार याबद्दल शासनाकडून कोणताही खुलासा न होणे, तसेच गिरण्यांच्या चाळीत राहणाऱ्या कामगारांना ३०० चौ.फूटाच्या खोल्या देखील न मिळणे, गेल्या १० वर्षात अनेक कामगार मृत होणे. वर्षानुवर्षे गिरण्यांमध्ये काम केलेल्या कामगारांना गिरण्यांच्या जागेवर घरे देण्याची मागणी शासनाकडे तसेच म्हाडाकडे अनेक वर्षापासून केली जात असणे, म्हणून मुंबईतील गिरणी कामगारांना घरे देण्याच्या दृष्टीने शासनाने विहित मर्यादेचा (टाईम बाउंड) कार्यक्रम आखून त्यांची ठोस अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

(७) ”राज्यात पोलिसांना २४ तासांहून अधिक तास काम करावे लागत असल्यामुळे त्यांच्यावर दिवसेंदिवस कामाचा ताण वाढणे, तसेच पुरेशी शासकीय निवासस्थाने उपलब्ध नसल्यामुळे अनेक पोलिसांना भाड्याच्या घरात रहावे लागत असणे, शासानाकडून देण्यात आलेल्या शासकीय निवासस्थानाची अत्यंत दुरवस्था असणे, कामाचा ताण, गृहनिर्माणाचा प्रश्न, यामुळे त्यांच्यात निर्माण होत असलेले तणावाचे वातावरण, परिणामी त्यांच्यावर मानसिक ताण वाढत असून त्यांच्यात आत्महत्येचे प्रमाण दिवसेंदिवस वाढणे, म्हणून पोलिसांच्या कार्यक्षमतेचा सर्वंकष विचार होऊन त्यांच्या कामाचे तास, एक साप्ताहिक सुट्टी, निवासस्थाने इत्यादी मूलभूत समस्यांबाबत कायमस्वरुपी तोडगा काढण्याच्यादृष्टीने शासनाने ठोस उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

(८) ”राज्यातील धार्मिक स्थळांच्या व तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी भाविकांची होणारी अफाट गर्दी, परंतु धार्मिक स्थळी व तीर्थक्षेत्राकडे लाखोंच्या संख्येने येणाऱ्या भाविकांना स्थानिक प्रशासनाकडून योग्य त्या सर्वसामान्य प्राथमिक सोयी सुविधाही उपलब्ध करुन दिल्या जात नसणे, परिणामी दर्शनाच्या वेळी चेंगराचेंगरीत शेकडो भाविकांचा मृत्यू होणे, यामध्ये अनेकजण गंभीर जखमी होणे, त्यामुळे राज्यातील धार्मिक स्थळांच्या, तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी शासनाने योग्य सुविधांचे नियोजन करून त्यांची अंमलबजावणी करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

(९) ”मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या अकार्यक्षमतेमुळे जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींची वेळीच दुरुस्ती होत नसल्याने ऐन पावसाळयात इमारती कोसळून जिवित व वित्त हानी होण्याचे वाढत असलेले प्रमाण, जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींची योग्यरित्या पाहणी करुन त्याचा विकास करणे, पुनर्रचनेची खोळंबलेली अनेक कामे, त्यातून मोठ्या

प्रमाणात होत असलेला भ्रष्टाचार, त्यामुळे रहिवाशांत पसरलेला तीव्र असंतोष, या संदर्भात साकल्याने विचार करुन त्यावर परिणामकारक उपाययोजना सुचविण्यासाठी विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती नेमण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

(१०) "राष्ट्रीय स्तरावर भारतीय प्रशासकीय सेवा, भारतीय पोलीस सेवा व तत्सम विविध स्पर्धा परीक्षांमध्ये उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये इतर राज्याच्या तुलनेत या राज्यातील विद्यार्थ्यांचे अत्यल्प प्रमाण लक्षात घेता हे प्रमाण वाढविण्यासाठी व उमेदवारांची अद्ययावत व योग्य पध्दतीने पूर्वतयारी करुन घेण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात किमान एक प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्याच्या दृष्टीने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

## श्री. शरद रणपिसे, वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ११ व १२

(११) "चंद्रपूर जिल्हयात दारुबंदी लागू करण्याचा घेण्यात आलेला निर्णय, या निर्णयाची जनमानसांत उमटलेली समाधानाची भावना, दारुच्या व्यसनामुळे व्यसनाधीन व्यक्तींचे उध्वस्त झालेले संसार, या व्यसनामुळे तरुण पिढी वाममार्गाला जात असल्याचे दिसून येणे, त्यांना त्यापासून परावृत्त करणे अशक्य असल्याचेही दिसून येणे, त्यामुळे या पिढीचे भवितव्य अंध:कारमय होणे, यावर उपाय म्हणून संपूर्ण राज्यात दारुबंदी धोरण अंमलात आणावे, अशी समाजाच्या विविध स्तरातून होत असलेली मागणी, या बाबी विचारात घेता संपूर्ण राज्यात दारुबंदी धोरण राबविण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(१२) "राज्यातील मुंबई, पुणे, नागपूर यासह बहुसंख्य शहरांची लोकसंख्या मोठया प्रमाणात वाढत असणे, या शहरांच्या विविध भागात दर दिवशी वाढत असलेले कचऱ्याचे ढीग, कचऱ्याचे व्यवस्थापन करण्याची महानगरपालिकांकडील यंत्रणा अपुरी व कालबाह्य झालेली असणे, शहरांतील भागात साठणाऱ्या या कचऱ्याचे व्यवस्थापन करण्यात महानगरपालिकांना येत असलेले अपयश, कचऱ्याच्या ढिगांमुळे अनेक भागात रोगराई पसरुन नागरिकांच्या आरोग्यास निर्माण झालेला धोका, दुर्गंधी पसरल्यामुळे रस्त्यावरुन नागरीकांना जाणे येणे मुश्कील होणे, महानगरपालिकांनी यावर परिणामकारक उपाययोजना करण्याची आवश्यकता असतानाही त्यांचेकडून तशी कार्यवाही न होणे, नागरिकांच्या आरोग्याशी हा प्रश्न निगडीत असल्यामुळे शासनस्तरावरुन यात लक्ष घालण्याची आवश्यकता विचारात घेता कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी परिणामकारक व कालबध्द कार्यक्रम आखण्यात यावेत, असे आदेश सर्व महानगरपालिकांना शासनाने द्यावेत व त्यानुसार परिणामकारक अंमलबजावणी होते किंवा कसे याचा आढावा घेण्यासाठी शासन स्तरावर उच्चस्तरीय यंत्रणा निर्माण करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

## श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स. यांचे ठराव क्रमांक १३, १४, १५, १६ व १७

(१३) "राज्यातील विनाअनुदान तत्त्वावर मान्यता देऊन सुरु करण्यात आलेल्या माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना अनुदानाअभावी प्रयोगशाळा, ग्रंथालये व इतर शैक्षणिक सोयी सुविधा उपलब्ध होऊ शकत नसणे, त्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर होणारा विपरीत परिणाम विचारात

घेता विनाअनुदान तत्त्वावर मान्यता दिलेल्या राज्यातील सर्व माध्यमिक शाळांना चालू शैक्षणिक वर्षापासून १०० टक्के अनुदान देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(१४) "राज्यातील पोलिसांना २४ तासांहून अधिक तास काम करावे लागत असल्यामुळे त्यांच्यावर दिवसेंदिवस कामाचा ताण वाढणे, तसेच त्यांच्याकरीता पुरेशी शासकीय निवासस्थाने उपलब्ध नसल्यामुळे अनेक पोलिसांना भाड्याच्या घरात रहावे लागत असणे, शासानाकडून देण्यात आलेल्या शासकीय निवासस्थानांची अत्यंत दुरवस्था असणे, कामाचा ताण, गृहनिर्माणाचा प्रश्न, यामुळे त्यांच्यात निर्माण होत असलेले तणावाचे व नैराश्याचे वातावरण, परिणामी त्यांच्यावर मानसिक ताण वाढत असून त्यांच्यात आत्महत्येचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असणे, पोलिसांच्या कार्यक्षमतेचा सर्वंकष विचार होऊन त्यांच्या कामाचे तास, एक साप्ताहिक सुट्टी, निवासस्थाने इत्यादी मूलभूत समस्यांबाबत कायमस्वरुपी तोडगा काढण्याच्यादृष्टीने शासनाने ठोस उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(१५) "राज्यातील वेगवेगळ्या प्रकल्पांमुळे विस्थापित झालेल्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे काम अद्यापही पूर्ण झालेले नसल्याने विस्थापितांचे होत असलेले हाल, त्यामुळे शासनाच्या विचाराधीन प्रकल्पांसाठी जमिनी देण्याच्या कामाला शेतकऱ्यांचा होत असलेला विरोध, त्याबाबत निर्माण केल्या जाणा-या कायदेशीर अडचणी, इ.बाबी विचारात घेता प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे रखडलेले काम तात्काळ पूर्ण करण्यासाठी कालबध्द धडक कार्यक्रम राबविण्यात यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(१६) "राज्यात उद्योग जगतात मोठ्या प्रमाणावर स्थानिक भूमीपूत्रांना रोजगार उपलब्ध न होणे, उद्योगांमध्ये भूमीपूत्राची संख्या नगण्य असल्याने राज्यात बेरोजगाराची संख्या प्रचंड प्रमाणात वाढणे, राज्यातील सेवायोजन कार्यालयामध्ये लाखो तरुणांनी नोकरीसाठी केलेली नोंद, उद्योगांमध्ये भूमीपूत्रांना नोक-या देण्यास शासन अपयशी ठरल्याने राज्यातील सुशिक्षित तरुणांमध्ये पसरलेले नैराश्य, राज्यातील बेरोजगार भूमीपूत्रांच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी यापुढे राज्यातील शासकीय, निमशासकीय तसेच खाजगी आस्थापनांवरील कार्यालयांमध्ये नोकरी देताना भूमीपूत्रांना प्राधान्याने नोकरीत घेण्यासाठी शासनाने धोरणात्मक निर्णय घ्यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(१७) "राज्यात महिला व तरुण मुलींवर होणारे वाढते अत्याचार व त्यांचे होणारे मृत्यू विचारात घेता महिलांवरील अत्याचारांबाबतचे खटले विनाविलंब निकालात काढण्यासाठी प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी स्वतंत्र न्यायालये स्थापन करण्यात यावीत, अशी शिफारस ही विधान परिषद शासनास करीत आहे."

## श्री. आनंदराव पाटील, वि.प.स. यांचे ठराव क्रमांक २०, २१, २२, २३ व २४

(२०) राज्यातील बहुसंख्य गावात विशेषत: उन्हाळयात पिण्याच्या पाण्याची भासत असलेली भीषण पाणी टंचाई, तसेच विविध कारणांमुळे बंद पडलेल्या अनेक पाणीपुरवठा योजना व त्यांच्या देखभालीत होणारी कुचराई, परिणामी, ग्रामीण जनतेचे पिण्याच्या पाण्यासाठी होणारे हाल विचारात घेता पाणी टचांई कायमस्वरुपी दूर करण्यासाठी शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद

शासनास करीत आहे

(२१) राज्यातील ऊसतोड कामगार ऊस तोडणीसाठी वर्षातील ८ महिने घराबाहेर राहत असल्यामुळे व त्यांच्यासोबत त्यांचे संपूर्ण कुटूंबही ऊस तोडणीसाठी स्थलांतरीत होत असल्यामुळे त्यांच्या मुलांना शिक्षणापासून वंचित रहावे लागत आहे, या ऊसतोड कामगारांच्या मुलांना शिक्षणाच्या संधी उपलब्ध व्हाव्यात यासाठी राज्यातील प्रत्येक तालुक्यात ऊसतोड कामगारांच्या मुलींसाठी निवासी शाळा सुरु करण्याची आवश्यकता, ऊस तोडणी कामगारांच्या महाविद्यालयात शिक्षण घेणा-या मुलांसाठी शासकीय वसतीगृहांमधून निवासाची व भोजनाची व्यवस्था करावी, तसेच मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या धर्तीवर ऊसतोडणी कामगारांच्या मुलांना शाळा, महाविद्यालयांमार्फत शिष्यवृत्ती व शुल्क सवलत देण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे

(२२) राज्यातील सर्व न्यायालयांचे कामकाज १०० टक्के मराठी भाषेतून होण्याच्या दृष्टीने आवश्यक ती उपाययोजना करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे

(२३) महाराष्ट्र राज्य हे प्रगतशील राज्य असून राज्यातील शेतकरी व शेतमजूर उत्पादन वाढवून मेहनतीने व कष्टाने घाम गाळून शेतीची मशागत करुन विकासाद्वारे राज्याला प्रथम क्रमांकावर आणण्यास शेतकऱ्याचा हातभार असणे, राज्यात अवकाळी पाऊस, दुष्काळ व नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांचे जीवन जगणे कठीण झाल्यामुळे वाढत असलेले आत्महत्येचे प्रमाण, शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी राज्य शासनाने किमान रु.५०००/- प्रति महिना पेन्शन देण्याची योजना सुरु करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.

(२४) राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण, नोकरी व रोजगारा अभावी त्यांच्यात निर्माण झालेले वैफल्य, शासनाने बंद केलेला सुशिक्षित बेरोजगार भत्ता, रोजगाराच्या भाग भांडवलासाठी बँकासारख्या आर्थिक संस्थाकडून येणाऱ्या अडचणी, या बाबी विचारात घेता बेरोजगारांच्या समस्या परिणामकारकपणे सोडविण्यासाठी व गरीब कुटूंबातील व्यक्तीला रोजगार मिळविण्याच्या दृष्टीने एक सक्षम व स्वतंत्र यंत्रणा स्थापन करण्यात यावी, सुशिक्षित बेरोजगारांना पुन्हा भत्ता सुरु करावा, रोजगारासाठी भागभांडवलाची सोय करावी व बंदी घालण्यात आलेली नोकर भरती पुन्हा सुरु करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे

## श्रीमती हुस्नबानू खलिफे, वि.प.स. यांचे ठराव क्रमांक २६, २७, २८ व २९

(२६) ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदूर्ग या जिल्ह्यांच्या किनारपट्टीवरील अनेक गावांच्या संरक्षणासाठी बांधण्यात आलेले धूप प्रतिबंधक बंधारे दरवर्षी अनेकवेळा फुटल्यामुळे समुद्राचे खारे पाणी जमिनीत शिरुन मालमत्तेचे, झाडांचे व शेतीचे सतत होणारे नुकसान, दिवसेंदिवस समुद्राच्या आक्रमणाची वाढती तीव्रता व परिणामी लोकांच्या मालमत्तेचे त्यामुळे मोठ्या प्रमाणात होत असलेले नुकसान लक्षात घेता समुद्राच्या वाढत्या अतिक्रमणाचा गंभीर स्वरुपाचा धोका निर्माण होऊ नये यासाठी शासनाने या पाचही जिल्ह्यांतील गावांच्या संरक्षणासाठी नियोजनबध्द व कालबध्द कार्यक्रम आखून त्याची त्वरीत अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.

(२७) कोकणातील ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदूर्ग जिल्ह्यातील वरकस जमिनी पाण्याखाली आणण्यासाठी तसेच पाण्याची निर्माण होत असलेली समस्या सोडविण्यासाठी कोयना धरणाचे वीजनिर्मितीनंतर वशिष्ठ नदीच्या (ता.चिपळूण,जि.रत्नागिरी) पात्रातून वाया जाणारे पाणी कोकणातील जिल्ह्यांना तसेच मुंबईसह ठाणे व नवी मुंबई या महानगरपालिकांच्या पिण्याच्या समस्या/दुष्काळी समस्या दूर करण्याच्या दृष्टीने शासनाने चिपळूण तालुक्यातील वशिष्ठ नदीतील पाणी परशुराम घाटाच्या पायथ्यापासून उचलून निसर्गाच्या गुरुत्वाकर्षणाच्या शक्तीने (लिफ्टींग) पूर्ण कोकण विभागाला पुरविण्याकरीता शासनाने एक खास कालबध्द कार्यक्रम आखून त्याची त्वरेने युध्दपातळीवर अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.

(२८) राज्यातील महिला व बालविकास विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या शेकडो वसतीगृहात निवास करुन अध्ययनाचे काम करीत असलेल्या हजारो विद्यार्थ्यांना दर्जात्मक शिक्षण, सकस आहार व आरोग्यविषयक सुविधा मिळत नसल्यामुळे त्यांचा शारिरिक व बौध्दिक विकास खुंटत असल्याने या विद्यार्थ्यांना आवश्यक त्या परिपूर्ण सुविधा मिळण्यासाठी शासनाने कालबध्द कार्यक्रम आखावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे

(२९) राज्यात महिला व तरुण मुलींवर होणारे अत्याचार व त्यांचे होणारे मृत्यू विचारात घेता महिलांवरील अत्याचारांबाबतचे खटले विनाविलंब निकालात काढण्यासाठी प्रत्येक जिल्हयाच्या ठिकाणी स्वतंत्र फास्ट ट्रॅक न्यायालये स्थापन करण्यात यावीत, अशी शिफारस ही विधान परिषद शासनास करीत आहे

## श्री. सुभाष झांबड, वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ३०, ३१, ३२, ३३ व ३४

(३०) राज्यात दिवसेंदिवस वाढत चाललेली महागाई तसेच सेवायोजन कार्यालयात नाव नोंदणी करुनही सुशिक्षित बेरोजगारांना नोकरीची संधी प्राप्त न होणे, सेवायोजन कार्यालयाकडून सन १९८५ पासून नोकरीसाठी मुलाखत पत्र न देणे, परिणामी बेरोजगारांना चरितार्थासाठी कोणतेही साधन उपलब्ध न झाल्याने चरितार्थ चालविणे जिकरीचे होणे, पदवी शिक्षण पूर्ण झाल्यानंतर पुढील ३ वर्षात नोकरी न मिळालेल्या बेरोजगारांना आर्थिक मदत म्हणून प्रतिमहा रुपये २५०० बेकारी भत्ता देण्यात यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे

(३१) राष्ट्रीय स्तरावर भारतीय प्रशासकीय सेवा, भारतीय पोलीस सेवा व तत्सम विविध स्पर्धा परीक्षांमध्ये उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये इतर राज्याच्या तुलनेत या राज्यातील विद्यार्थ्यांचे अत्यल्प प्रमाण लक्षात घेता हे प्रमाण वाढविण्यासाठी व उमेदवारांची अद्ययावत व योग्य पध्दतीने पूर्वतयारी करुन घेण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्हयात किमान एक प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्याच्या दृष्टीने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे

(३२) राज्यातील मराठवाडा व विदर्भ तुलनात्मकदृष्टया मागासलेले विभाग असल्याने त्यांच्या विकासाच्या दृष्टीने परळी-बीड-नगर, नांदेड-किनवट-यवतमाळ-नागपूर, सोलापूर-उस्मानाबाद-बीड-औरंगाबाद-जळगांव या नविन रेल्वे मार्गाच्या कामाचा सर्व्हे करुन त्वरीत मंजूर करुन घेण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे

(३३) विदर्भातील हातमाग, विणकरांच्या जटील बनत चाललेल्या विविध समस्या, तसेच त्यांची आर्थिक दुरवस्था व ते जगत असलेले हलाखीचे जीवन यात सुधारणा होण्याच्या दृष्टीने शासनाने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे

(३४) राज्यातील महिला व बालविकास विभागामार्फत चालविण्यात येणा-या शेकडो वसतीगृहात निवास करुन अध्ययनाचे काम करीत असलेल्या हजारो विद्यार्थ्यांना दर्जात्मक शिक्षण, सकस आहार व आरोग्यविषयक सुविधा मिळत नसल्यामुळे त्यांचा शारिरिक व बौध्दिक विकास खुंटत असल्याने या विद्यार्थ्यांना आवश्यक त्या परिपूर्ण सुविधा मिळण्यासाठी शासनाने कालबध्द कार्यक्रम आखावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे

## आर्कि. अनंत गाडगीळ, वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ३५, ३६ व ३७

(३५) राज्यातील खेळाडूची राष्ट्रीय स्तरावर होत असलेली पीछेहाट लक्षात घेता क्रीडा क्षेत्राचा सर्वांगिण विकास होण्याकरीता व दर्जेदार खेळाडू तयार करण्यासाठी तालुकास्तरावर क्रीडा प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यात यावीत व त्यासाठी प्रशिक्षित मार्गदर्शक नेमण्यात यावेत व अशा केंद्राना अद्ययावत साहित्य व आर्थिक सहाय्य देण्यात यावे , अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.

(३६) राज्यातील महिला व बालविकास विभागामार्फत चालविण्यात येणा-या शेकडो वसतीगृहात निवास करुन अध्ययनाचे काम करीत असलेल्या हजारो विद्यार्थ्यांना दर्जात्मक शिक्षण, सकस आहार व आरोग्यविषयक सुविधा मिळत नसल्यामुळे त्यांचा शारिरिक व बौध्दिक विकास खुंटत असल्याने ह्या विद्यार्थ्यांना आवश्यक त्या परिपूर्ण सुविधा मिळण्यासाठी शासनाने कालबध्द कार्यक्रम आखावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे

(३७) राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व त्यांच्यात रोजगाराअभावी निर्माण झालेले वैफल्याचे व असंतोषाचे वातावरण लक्षात घेता बेरोजगारांची समस्या परिणामकारक पध्दतीने सोडविण्यासाठी सेवायोजन आणि रोजगार व स्वयंरोजगार कार्यालये अधिक कार्यक्षम करण्यासाठी तसेच संबंधित प्रश्नावर उपाययोजना सुचविण्यासाठी विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे

## श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ३८, ३९, ४०, ४१ व ४२

(३८) "राज्यात प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी नगरपालिका स्थापन करण्याचा निर्णय शासनाने जाहिर करणे, त्यानुसार नगर पंचायती व पालिकांची निर्मिती होणे, यामुळे नगर पालिकांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढणे, राज्यातील प्रत्येक विभागीय स्तरावर नगर पालिका प्रशासन सक्षमपणे चालविण्यासाठी नगरपालिका आयुक्तालय स्थापन करावे, अशी शिफारस विधान परिषद शासनास करीत आहे."

(३९) " राज्यातील माध्यमिक, उच्च माध्यमिक आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रभक्ती, राष्ट्रप्रेम आणि शिस्त निर्माण व्हावी यादृष्टीने राज्यातील सर्व शाळा आणि महाविद्यालयात एन.सी.सी. चा अभ्यासक्रम किंवा त्या धर्तीवर एम.सी.सी. चा अभ्यासक्रम अनिवार्य करावा व प्रत्येक शाळा, महाविद्यालयात त्याचे शिक्षण सर्व विद्यार्थ्यांना अनिवार्य करावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

(४०) ''सामुहिक विवाह सोहळ्यांना प्रोत्साहन मिळावे म्हणून अशा सामुहिक विवाह सोहळ्यात विवाहबध्द होणाऱ्या सर्वधर्मीय दाम्पत्यांना आणि सामुहिक विवाह सोहळे आयोजित करणाऱ्या सेवाभावी संस्थांना पुरेसे अर्थसहाय्य तसेच अनुदान देण्याची योजना शासनाने त्वरीत आखावी, अशी शिफारस ही विधान परिषद शासनास करीत आहे.''

(४१) राज्यात विशेषत: मराठवाड्यात सतत निर्माण होणारी भिषण दुष्काळ आणि तीव्र पाणी टंचाई परिस्थिती लक्षात घेता दुष्काळ निवारणार्थ करावयाच्या कायमस्वरुपी उपाययोजना, मराठवाड्यात शाश्वत शेतीसाठी सिंचन अभियान सुरु करून मराठवाड्यातील सिंचनाचा जल आराखडा तयार करून त्याची अंमलबजावणी करण्यासाठी मराठवाड्यासाठी सक्षम जल आयुक्तालय सुरु करावे, अशी शिफारस ही विधान परिषद शासनास करीत आहे.

(४२) ''राज्यातील विशेषत: मराठवाड्यातील सर्व गावे बारमाही वाहतुकीस योग्य व्हावीत, नद्या, नाले व मोऱ्या यांच्यावरील पुलांची बांधकामे व दुरुस्ती करुन ग्रामीण भागातील रस्ते वाहतुकीसाठी योग्य करण्यासाठी धडक योजना शासनाने हाती घ्यावी आणि जिल्हा स्तरावर रस्त्याच्या अंतराच्या प्रमाणात ग्रामीण रस्त्याच्या दुरुस्ती आणि मजबुतीकरणासाठी निधी उपलब्ध करावा अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

## डॉ. अपूर्व हिरे, वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ४३, ४४, ४५, ४६ व ४७

(४३) ''शासनातर्फे राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शाळा व महाविद्यालयांमार्फत स्कॉलरशिप व शुल्क सवलत दिली जाते त्याच धर्तीवर राज्यातील अल्पभूधारक शेतकरी कुटुंबातील पाल्यांना शाळा व महाविद्यालयांमार्फत स्कॉलरशिप व शुल्क सवलत देण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

(४४) ''राज्यात सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व त्यांच्या रोजगाराअभावी निर्माण झालेले वैफल्याचे व असंतोषाचे वातावरण लक्षात घेता बेरोजगारांची समस्या परिणामकारक पद्धतीने सोडविण्यासाठी सेवायोजना आणि रोजगार व स्वयंरोजगार कार्यालये अधिक कार्यक्षम करण्यासाठी तसेच संबंधित प्रश्नावर उपाययोजना सुचविण्यासाठी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

(४५) ''राज्यातील शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी लागणारी रासायनिक खते, अवजारे, किटकनाशके यांच्या किंमतीमध्ये सतत होणारी वाढ, तसेच शेतकऱ्यांना शेतीमालाचे न परवडणारे भाव विचारात घेता, उत्पादन खर्चावर आधारित असे शेतीमालाचे भाव शेतकऱ्यांना मिळण्याच्यादृष्टीने राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफरस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

(४६) ‘‘राज्यातील बहुसंख्य गावात विशेषत: उन्हाळयात पिण्याच्या पाण्याची भासत असलेली भीषण पाणी टंचाई, तसेच विविध कारणांमुळे बंद पडलेल्या अनेक पाणीपुरवठा योजना व त्यांच्या देखभालीत होणारी कुचराई, परिणामी ग्रामीण जनतेचे पिण्याच्या पाण्यासाठी होणारे हाल विचारात घेता पाणी टंचाई कायमस्वरुपी दूर करण्यासाठी शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.’’

(४७) ‘‘राष्ट्रीय स्तरावर भारतीय प्रशासकीय सेवा, भारतीय पोलीस सेवा व तत्सम विविध स्पर्धा परीक्षांमध्ये उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये इतर राज्याच्या तुलनेत या राज्यातील विद्यार्थ्यांचे अत्यल्प प्रमाण लक्षात घेता हे प्रमाण वाढविण्यासाठी व उमेदवारांची अद्ययावत व योग्य पद्धतीने पूर्वतयारी करुन घेण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात किमान एक प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्याचे दृष्टीने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.’’

## श्री. जयंत पाटील, वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ४८, ४९, ५०, ५१ व ५२

(४८) ”राष्ट्रीय स्तरावर भारतीय प्रशासकीय सेवा, भारतीय पोलीस सेवा व तत्सम विविध स्पर्धा परीक्षांमध्ये उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये इतर राज्याच्या तुलनेत या राज्यातील विद्यार्थ्यांचे अत्यल्प प्रमाण लक्षात घेता हे प्रमाण वाढविण्यासाठी व उमेदवारांची अद्ययावत व योग्य पद्धतीने पूर्वतयारी करून घेण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात किमान एक प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्याचे दृष्टीने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

(४९) ”राज्यात ग्रामीण भागातील ग्रामपंचायतींना देखभालीसाठी हस्तांतरित करण्यात आलेल्या नळ पाणी पुरवठा योजना निधी अभावी बंद पडतात, व्यवस्थापन नीट होत नाही, त्यामुळे देखभाल व व्यवस्थापन सुरळीत होण्यासाठी शासनाने या सर्व नळ पाणी पुरवठा योजना स्वतंत्र महामंडळाकडे सोपवाव्यात, अशी शिफारस हि विधानपरिषद शासनास करीत आहे.”

(५०) “राज्यात विशेषत: ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या जिल्ह्यांच्या किनारपट्टीवरील अनेक गावांच्या संरक्षणासाठी हजारो किलोमीटर लांबीचे बांधण्यात आलेले धूप प्रतिबंध बंधारे दरवर्षी अनेक वेळा फुटल्यामुळे समुद्राचे खारे पाणी शेत जमिनीत शिरून शेतीचे व झाडांचे सतत होणारे नुकसान, दिवसेंदिवस समुद्राच्या आक्रमणाची वाढती तीव्रता व परिणामी लोकांच्या मालमत्तेचे मोठ्या प्रमाणात होत असलेले नुकसान लक्षात घेता समुद्राच्या वाढत्या अतिक्रमणाचा गंभीर स्वरूपाचा धोका निर्माण होऊ नये यासाठी शासनाने या पाचही जिल्ह्यांतील किनारपट्टीवरील गावांच्या संरक्षणासाठी नियोजनबद्ध व कालबद्ध कार्यक्रम आखून त्वरीत अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

(५१) “राज्यातील खेळाडुंची राष्ट्रीय स्तरावर होत असलेली पिछेहाट लक्षात घेता क्रीडा क्षेत्राचा सर्वांगिण विकास होण्याकरीता व दर्जेदार खेळाडू तयार करण्यासाठी तालुकास्तरावर क्रीडा प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यात यावीत व त्यासाठी प्रशिक्षित मार्गदर्शक नेमण्यात यावेत व अशा केंद्रावर अद्ययावत साहित्य व आर्थिक सहाय्य देण्यात यावे, अशी शिफारस ही विधापरिषद शासनास करीत आहे”

(५२) "राज्यात प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी नगरपालिका स्थापन करण्याचा निर्णय शासनाने जाहीर करणे, त्यानुसार नगरपंचायती व नगरपालिकांची निर्मिती होणे, त्यामुळे नगरपालिकांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढणे, राज्यातील प्रत्येक विभागीय स्तरावर नगरपालिका प्रशासन सक्षमपणे चालविण्यासाठी विभागीय स्तरावर नगरपालिका आयुक्तालय स्थापन करावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे"

## डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ५४, ५५ व ५६

(५४) "राज्यातील सर्व धर्मादाय शैक्षणिक संस्थांचे योग्य प्रशासन व नियोजन होणे आवश्यक आहे म्हणून सदर संस्थांचा कारभार पाहण्यासाठी स्वतंत्र शैक्षणिक धर्मादाय आयुक्तालयाची निर्मिती करण्यात यावी, अशी शिफारस ही विधान परिषद शासनास करीत आहे"

(५५) "राज्यातील समाजकल्याण, आदिवासी विकास विभाग आणि महिला व बालकल्याण विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या शेकडो वसतिगृहात निवास करून अध्ययनाचे काम करीत असलेल्या विद्यार्थांना दर्जात्मक शिक्षण, सकस आहार व आरोग्यविषयक सुविधा मिळत नसल्यामुळे त्यांच्या शारीरिक व बौद्धिक विकासावर विपरीत परिणाम होत असल्याने या सर्व विद्यार्थांना आवश्यक त्या परिपूर्ण सुविधा मिळण्यासाठी शासनाने कालबध्द कार्यक्रम तयार करावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे"

(५६) "राज्यात महिला व तरुण मुलींवर होणारे अत्याचार व त्यांचे होणारे मृत्यू विचारात घेता महिलांवरील अत्याचारांबाबतचे खटले विनाविलंब निकालात काढण्यासाठी प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी स्वतंत्र फास्ट ट्रॅक न्यायालये स्थापन करण्यात यावीत, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

## श्री. रामहरी रुपनवर, वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ५७, ५८, ५९, ६० व ६१

(५७) राज्यातील महिला व बालविकास विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या शेकडो वसतीगृहात निवास करुन अध्ययनाचे काम करीत असलेल्या हजारो विद्यार्थ्यांना दर्जात्मक शिक्षण, सकस आहार व आरोग्यविषयक सुविधा मिळत नसल्यामुळे त्यांचा शारिरिक व बौध्दिक विकास खुंटत असल्याने या विद्यार्थ्यांना आवश्यक त्या परिपूर्ण सुविधा मिळण्यासाठी शासनाने कालबध्द कार्यक्रम आखावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे

(५८) राज्यातील बहुसंख्य गावात विशेषत: उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्याची भासत असलेली भीषण पाणी टंचाई, तसेच विविध कारणांमुळे बंद पडलेल्या अनेक पाणीपुरवठा योजना व त्यांच्या देखभालीत होणारी कुचराई, परिणामी, ग्रामीण जनतेचे पिण्याच्या पाण्यासाठी होणारे हाल विचारात घेता पाणी टचांई कायमस्वरुपी कमी करण्यासाठी शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.

(५९) शासनातर्फे राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शाळा व महाविद्यालयामार्फत स्कॉलरशिप व शुल्क सवलत दिली जाते त्याच धर्तीवर राज्यातील अल्पभूधारक शेतकरी कुटूंबातील पाल्यांना शाळा व महाविद्यालयांमार्फत स्कॉलरशिप व शुल्क सवलत देण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे

(६०) राष्ट्रीय स्तरावर भारतीय प्रशासकीय सेवा, भारतीय पोलीस सेवा व तत्सम विविध स्पर्धा परीक्षांमध्ये उत्तीर्ण होणा-या विद्यार्थ्यांमध्ये इतर राज्याच्या तुलनेत या राज्यातील विद्यार्थ्यांचे अत्यल्प प्रमाण लक्षात घेता हे प्रमाण वाढविण्यासाठी व उमेदवारांची अद्ययावत व योग्य पध्दतीने पूर्वतयारी करुन घेण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्हयात किमान एक प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्याच्या दृष्टीने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.

(६१) थोर समाजसुधारक व स्त्री शिक्षण चळवळीचे प्रणेते महात्मा ज्योतिबा फुले व ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले या दोन समाजप्रबोधकांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार प्रदान करण्यात यावा, अशी मागणी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे

## प्रा. जोगेन्द्र कवाडे, वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ६२ व ६४

(६२) राज्यात जीवनावश्यक वस्तुंचे बेसुमार वाढत असलेले भाव, त्यावर योग्य नियंत्रण ठेवता न येणे, सणासुदीच्या काळात चणाडाळ, मूगडाळ, साखर तसेच अन्य डाळी, तेल, कडधान्य इत्यादी खाद्यवस्तूंचा कृत्रिम तुटवडा निर्माण करुन त्या वस्तुंची बेसुमार भाववाढ करण्याची व्यापारी वर्गात निर्माण झालेली प्रवृत्ती, त्यामुळे जनतेवर पडत असलेला आर्थिक ताण, या सर्व गोष्टींचा सर्वंकष विचार करुन भाववाढ रोखण्याबाबत व जीवनावश्यक वस्तूंच्या नियंत्रणाबाबत एक प्रभावी यंत्रणा निर्माण करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.

(६४) राज्यात दूरदर्शन तसेच केबल नेटवर्कद्वारे विविध खाजगी दुरचित्रवाहिन्यांमार्फत अश्लिल व हिसांचाराला उत्तेजन देणारे चित्रपट, जाहिराती तसेच निरनिराळ्या मालिका सर्रासपणे दाखविल्या जात असणे, परिणामी राज्यातील तरुण पिढीवर त्याचा होणारा दुष्परिणाम व वाढते लैंगिक व अन्य गुन्हे लक्षात घेता अशाप्रकारच्या कार्यक्रमावर केंद्र शासनाने तात्काळ बंदी घालावी यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.

## श्री. सुनिल तटकरे, वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ६७, ६८, ६९, ७० व ७१

(६७) कोकणातील भूभागांपैंकी सुमारे ५३.४५ टक्के पडीक असलेल्या जमिनीत आंबा,काजू,सुपारी,कोकम, नारळ इ.फळांची लागवड आणि साग,शिसम,ऐन,किंजळ,खैर इ. वृक्षांची वनराईची पध्दतशीर लागवड करण्याच्या दृष्टीने धडक कार्यक्रम हाती घेऊन या कार्यक्रमासाठी आर्थिक तरतूद व अन्य उपाययोजना करण्यात यावी, अशी शिफारस ही विधान परिषद शासनास करीत आहे.

(६८) नापिकी, अतिवृष्टी, जलप्रकोप, दुबार पेरणी, तिबार पेरणी, ओला व कोरडा दुष्काळ अशा नैसर्गिक आपत्ती असूनही पीक विमा नुकसान भरपाई पासून आणेवारी व उंबरठा उत्पन्नाच्या जाचक निकषामुळे शेतकरी वंचित राहत असणे, याला शंभर वर्ष जुनी ब्रिटीशकालीन आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष कारणीभूत असल्याने त्यात बदल करुन सुधारित आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष तयार करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधान परिषद शासनास करीत आहे.

(६९) कोकण रेल्वे मार्गावरील प्रवाशांची वाढती संख्या विचारात घेता कोकणात रेल्वे मार्ग दुपदरी (सेकंड ट्रॅक) करावा तसेच या रेल्वे मार्गावरील प्रत्येक रेल्वे स्थानकावर प्रवाशांसाठी पत्र्याची कायमस्वरुपी शेड उभारण्यात यावी, महिला प्रवाशांची होत असलेली गैरसोय लक्षांत घेता तेथे सुलभ शौचालय व अन्य अत्यावश्यक सोयीसुविधा उपलब्ध करण्याकरिता शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधान परिषद शासनास करीत आहे

(७०) कोकणातील आंबा, काजू इत्यादि पिकांचे नैसर्गिक आपत्तीमुळे फार मोठ्या प्रमाणात होणारे नुकसान लक्षात घेता अन्नधान्य, गळीतधान्य, तेलबिया इत्यादि पिकांसाठी केंद्र शासनामार्फत पुरस्कृत करण्यात आलेली सर्वकष पिक विमा योजना ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदूर्ग या जिल्ह्यांतील आंबा, काजू इत्यादि फळपिकांना लागू करण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधान परिषद शासनास करीत आहे.

(७१) राज्यात शेती व्यवसायासाठी लागणारी रासायनिक खते, अवजारे, किटकनाशके यांच्या किंमतीमध्ये सतत होणारी वाढ, तसेच शेतकऱ्यांना शेतीमालाचे न परवडणारे भाव विचारात घेता, उत्पादन खर्चावर आधारित असे शेतीमालाचे भाव शेतकऱ्यांना मिळण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधान परिषद शासनास करीत आहे.

## श्री. अनिल भोसले, वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ७२, ७३, ७४, ७५ व ७६

(७२) राज्यातील शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी लागणारी रासायनिक खते, अवजारे, किटकनाशके यांच्या किंमतीमध्ये सतत होणारी वाढ, अल्प प्रमाणातील महागडे मजूरवर्ग, सिंचनासाठीच्या पाणी दरामध्ये सतत होणारी वाढ, सवलतीच्या दरात शेतीपंपास वीजपुरवठा न मिळणे, जनावरांच्या तुलनेत शेतीकामात यंत्राचा वापर वाढल्याने शेती सामग्रीतील अवाढव्य वाढ, नैसर्गिक व जैविक, शेती उत्पादन प्रयोगास पुरेसे संरक्षण विचारांत न घेणे, हया सर्व बाबी विचारात घेता उत्पादन खर्चावर आधारित असे शेतीमालाचे भाव ठरविण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधान परिषद शासनास करीत आहे.

(७३) राज्यातील बहुसंख्य गावात विशेषत: उन्हाळयात पिण्याच्या पाण्याची भासत असलेली भीषण पाणी टंचाई, तसेच विविध कारणांमुळे बंद पडलेल्या अनेक पाणीपुरवठा योजना व त्यांच्या देखभालीत होणारी कुचराई, परिणामी ग्रामीण जनतेचे पिण्याच्या पाण्यासाठी होणारे हाल विचारात घेता पाणी टंचाई कायमस्वरुपी कमी करण्यासाठी शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधान परिषद शासनास करीत आहे.

(७४) राज्यातील राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गावर मोठया प्रमाणात होत असलेले अपघात, अपघातस्थळी अपघातग्रस्तांवर उपचार करण्यासाठी शासकीय रुग्णालय नसणे, या अपघातग्रस्तांवर उपचार करण्यासाठी राज्यमार्ग,राष्ट्रीय महामार्ग येथे सार्वजनिक आरोग्य विभागाच्या माध्यमातून लहान-लहान उपचार केंद्र सुरु झाल्यास येथे वैद्यकीय अधिकारी, स्टाफ, नर्सेस व इतर कर्मचारी यांची नेमणूक केली गेली तर सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार

मिळून राज्यातील बेरोजगारी दूर होण्यास मदत होईल तसेच अपघातग्रस्तांना वेळीच उपचार होतील. म्हणून राज्यमार्ग व राष्ट्रीय महामार्गावर ५० कि.मी.अंतरावर प्रत्येक ठिकाणी एक-एक उपचार केंद्र उघडण्यात यावे, अशी शिफारस ही विधान परिषद शासनास करीत आहे.

(७५) राज्यातील धार्मिक स्थळांच्या व तिर्थक्षेत्राच्या ठिकाणी भाविकांची होणारी अफाट गर्दी, परंतु धार्मिक स्थळी व तिर्थक्षेत्राकडे लाखोंच्या संख्येने येणाऱ्या भाविकांना स्थानिक प्रशासनाकडून योग्य त्या सर्वसामान्य प्राथमिक सोयीसुविधांही उपलब्ध करुन दिल्या जात नसणे, परिणामी दर्शनाच्यावेळी चेंगराचेंगरीत शेकडो भाविकांना मृत्यू येणे, यामध्ये अनेक जण गंभीर जखमी होणे, त्यामुळे राज्यातील धार्मिक स्थळांच्या, तिर्थक्षेत्राच्या ठिकाणी शासनाने योग्य सुविधांचे नियोजन करण्याच्या दृष्टीने तशा योजना आखाव्यात व त्यांची अंमलबजावणी करण्यात यावी, अशी शिफारस ही विधान परिषद शासनास करीत आहे.

(७६) "छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पराक्रमाची गौरवगाथा सांगणाऱ्या किल्ले रायगडाच्या नुतनीकरणासाठी सातत्याने पाठपुरावा करुनही त्याकडे भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाने दुर्लक्ष केले आहे. रायगड,विजयदुर्ग,सिंधुदूर्ग सह राज्यातील प्रमुख किल्ल्यांचे नुतनीकरण करणे तसेच राज्यातील अन्य किल्ल्याची देखभाल व दुरुस्ती करण्याची परवानगी राज्य शासनाला द्यावी याकरिता राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

## श्री. किरण पावसकर, वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ७७, ७८, ७९ व ८०

(७७) कोकणातील ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदूर्ग या पाच जिल्ह्यांसाठी एक स्वतंत्र मत्स्य विद्यापीठ स्थापन करुन त्यात मत्स्यव्यवसायासंबंधी विविध अभ्यासक्रम अंतर्भूत करावेत,अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.

(७८) राज्यातील खेळांडूची राष्ट्रीय स्तरावर होत असलेली पिछेहाट लक्षात घेता क्रीडा क्षेत्राचा सर्वांगीण विकास होण्याकरिता व दर्जेदार खेळाडू तयार करण्यासाठी तालुकास्तरावर क्रीडा प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यात यावीत व त्यासाठी प्रशिक्षित मार्गदर्शक नेमण्यात यावेत व अशा केंद्रांना आवश्यक ते साहित्य पुरविण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.

(७९) राज्यात राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गावर मोठ्या प्रमाणात होत असलेले अपघात, अपघातस्थळी अपघातग्रस्तांवर उपचार करण्यासाठी शासकीय रुग्णालये नसणे, या अपघातग्रस्तांवर उपचार करण्यासाठी राज्यमार्ग, राष्ट्रीय महामार्ग येथे सार्वजनिक आरोग्य विभागाच्या माध्यमातून लहान-लहान उपचार केंद्रे सुरु करणे, सदरची उपचार केंद्रे सुरु झाल्यास तेथे वैद्यकीय अधिकारी, स्टाफ नर्सेस व इतर कर्मचारी नेमणूक केली गेली तर सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार मिळून राज्यातील बेरोजगारी दूर होण्यास मदत होईल तसेच अपघातग्रस्तांवर वेळीच उपचार होतील. म्हणून राज्यमार्ग व राष्ट्रीय महामार्गावर ५० कि.मी. अंतरावर प्रत्येक ठिकाणी एक-एक उपचार केंद्र उघडण्यात यावे, अशी शिफारस ही विधान परिषद शासनास करीत आहे.

(८०) राज्यात पर्यटन स्थळांचा विकास करण्यासाठी तसेच त्या ठिकाणी पर्यटकांसाठी मार्गदर्शक नेमणे व अन्य आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करुन देऊन त्या माध्यमातून तेथील

युवकांना रोजगार उपलब्ध करणे यासाठी राज्यातील सर्व पर्यटन स्थळांचे महत्व कायम राखण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने खास उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे

## प्रा. अनिल सोले, वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ९७ व ९८

(९७) ‘‘राज्यातील औद्योगिक वसाहती व कारखान्यांचे वाढते प्रमाण, त्यामुळे बहुतांश जिल्ह्यात वायू प्रदूषण व जल प्रदूषणाची निर्माण झालेली समस्या, कोळसाखाणी पासून होत असलेले प्रदूषण, लहान मोठे उद्योजक त्यात थर्मल पॉवर स्टेशन, एम.आय.डी.सी.तील उद्योग, सिमेंट कारखाने, पेपर मिल, यापासून होत असलेले प्रदूषण, उद्योजक करारनामा करूनही देखील नियम पाळत नसणे, विशेषतः ज्या भागात दुर्मिळ वनसंपदा तसेच वन्यजीवांचे वास्तव्य आहे त्या भागात कोळसा खाणीसाठी परवानगी देण्याचे चाललेले प्रकार, त्यामुळे वन व वन्यजीवांचे अस्तित्व धोक्यात येणे, त्यातच शासनाला अपुऱ्या साधनसामुग्रीमुळे प्रदूषणास आळा घालण्याकरिता येत असलेले अपयश, परिणामी जनतेच्या आरोग्याचा निर्माण झालेला प्रश्न, यावर नियंत्रण ठेवण्याकरिता शासनाने विशेष यंत्रणा निर्माण करावी, तसेच पर्यावरणाचा होणारा -हास लक्षात घेता आरक्षित वनांच्या ठिकाणी देण्यात आलेले कोलब्लॉक्स रद्द करावे. अशी शिफारस ही विधान परिषद शासनास करीत आहे.’’

(९८) ‘‘विदर्भात नागपूर, चंद्रपूर, गडचिरोली जिल्ह्यात आरोग्य सुविधेचा असलेला अभाव, नागपूर येथील शासकिय वैद्यकिय महाविद्यालय येथील गेल्या १० दिवसापासून सीटी स्कॅन यंत्र बंद असणे, मेडीकल येथे एम.आर.आय. चे निदान बि.पी.एल. रूग्णाकरीता मोफत न होणे, त्यासाठी मोठ्या प्रमाणात शुल्क आकारले जाणे, गरीब रूग्णांना आर्थिक भुर्दड सोसावा लागणे, त्यातच सुपर स्पेशालीटी येथील हृदयरोगावर ॲन्जिओग्राफी करण्यापूर्वी आवश्यक असणारे द्रव्य (डाय) इंजेक्शनचा तुटवडा निर्माण होणे, ॲन्जीओग्राफी करण्यास अडचण निर्माण होणे, श्वसन विकार विभागात सहा व्हेंटीलेटर पैकी एकच व्हेंटिलेटर सुरू असणे, त्यातच हृदय, पोटाचे विकार, मेंदूज्वर, अशा विशेष उपचार केन्द्रात स्वतंत्र रक्तपेढी सुरू करण्यात येवूनही रक्त घटक विघटन करण्यासाठी यंत्रणाच कार्यान्वीत नसणे, मेडीकल संलग्नीत कॅन्सर इंस्टिट्यूटचा प्रस्ताव ४ वर्षापासून शासनास सादर करूनही त्यास मंजूरी न मिळणे, अशा विविध समस्यामुळे आरोग्य सेवा कोलमडली जाणे, त्यातच तज्ञ डॉक्टरांच्या जागा रिक्त असल्याने योग्य उपचार न होणे, त्यामुळे नागरीकाच्या हिताच्या दृष्टीने आरोग्य सुविधा सुरळीत करण्याची आवश्यकता, अशी शिफारस ही विधान परिषद शासनाला करीत आहे.’’

## श्री. जगन्नाथ शिंदे, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक १२५

(१२५) राज्यातील कोणतीही व्यक्ती उपचारा अभावी जीवानिशी जाता कामा नये, या तत्वानुसार राज्य शासनाने सुरु केलेली १०८ क्रमांकाची रुग्णवाहिका सेवा रुग्णाला घरून शासकीय रुग्णालयात अथवा शासकीय रुग्णालयातून दुस-या शासकीय रुग्णालयात नेण्यासाठी मर्यादित असल्याने, अनेकदा प्राथमिक गरज लक्षात घेऊन गोर-गरीब रुग्णांना नातेवाईक अथवा जवळच्या व्यक्ती नजीकच्या रुग्णालयात दाखल करत असतात. मात्र नंतर त्या रुग्णालयाचा वाढता खर्च लक्षात घेता अशा रुग्णांना शासकीय रुग्णालयात स्थलांतरित करताना १०८ क्रमांकाच्या रुग्णवाहिकेची सेवा शासकीय नियमानुसार उपलब्ध करून दिली जात नाही. तरी

रुग्णांच्या नातेवाईक व रुग्णांची तत्कालीन अवस्था लक्षात घेता प्राथमिक उपचारासाठी खाजगी रुग्णालयात दाखल केलेल्या रुग्णांना किमान शासकीय रुग्णालयात स्थलांतरित करताना १०८ क्रमांकाची रुग्णवाहिका शासनाने यापुढील काळात उपलब्ध करून द्यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.

**अठ्ठावीस** : सर्वसाधारण सार्वजनिक हितसंबंधाच्या बाबी.

**एकोणतीस** : सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेली कागदपत्रे (यादी अंतिम कार्यावली सोबत जोडण्यात येईल.)

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : २२ फेब्रुवारी, २०१७.

**डॉ.अनंत कळसे,**
प्रधान सचिव
महाराष्ट्र विधानपरिषद.